क्रमांक : १०६६२/ क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २२ जून, २०२३.

**संदर्भ :- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -११२३/प्र.क्र.६३/१६-अ दिनांक ०९ जून, २०२३.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीत, आपत्तीग्रस्त नागरीकांच्या मदतीसाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीकरीता राज्य शासनाकडून मदतकार्यासाठी पुढाकार घेण्यात आला असून, या नैसर्गिक आपत्तीस सामोरे जाण्यासाठी सहाय्य आणि मदत व पुनर्वसनाच्या कामास आपलाही हातभार लागावा म्हणून राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी माहे जून, २०२३ च्या आपल्या वेतनातील प्रत्येकी १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये आवाहन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे माहे जून,२०२३ च्या वेतनातील प्रत्येकी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची मासिक वेतनातून रक्कम वसूल करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र 'क-३' (लेखा) कक्षाकडे द्यावे.

आदेशानुसार,

**( सायली कांबळी)**
उप सचिव (विधी),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

..२/-

**प्रती,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते (महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

७) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य व विद्युत), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) व्यवस्थापक, विधानमंडळ कर्मचारी उपहारगृह, विधान भवन, मुंबई.